# बहिणाबाई चौधरी विद्यापीठात व्याख्यान

जळगाव, ता. २८ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्था व क्वीक हिल फाउंडेशनतर्फे विद्यापीठात 'सायबर सुरक्षा' याविषयावर शनिवारी (ता. २८) व्याख्यान झाले.

क्वीक हिल फाउंडेशनच्या निकिता लोहार व दर्शन नेवे यांनी ई-मेलद्वारे होणारा छळ, सायबर स्टॉकिंग, सायबर विश्वातून होणारा पाठलाग, सायबर विश्वासातून पसरविली जात असलेली अश्लीलता, सायबर बदनामी, संगणकाच्या माध्यमातून इंटरनेटवरील मजकूर किंवा छायाचित्रांमध्ये फेरफार करणे, ई-मेलद्वारे होणारे विडंबन/ टवाळकी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करून त्याविषयीच्या उपाययोजना व तक्रारींचे निवारण याबद्दल माहिती दिली.

संचालक प्रा. जे. बी. नाईक अध्यक्षस्थानी होते. २०० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. समन्वयक प्रा. विश्वराज तायडे यांनी आभार मानले.